दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे मो.नं. ९४२२६६००७७

बीड/महाराष्ट्र | रविवार १९ मे २०२४ | आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ | वर्ष १ ले | अंक २७५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

# मनोज जरांगे यांनी उपसलं शेवटचं अस्त्र घोषणा करुन राजकीय पक्षांना फोडला घाम

## सगे सोयऱ्यांना आरक्षण देण्याची अंमलबजावणी झाली नाही तर मी विधानसभेच्या २८८ जागा लढवणार

**वादळवार्ता प्रतिनिधी** आपल्या मागण्या मान्य होत नसल्याने अखेर मनोज जरांगे पाटील यांनी शेवटचं हत्यार उपसलं आहे. लोकसभा निवडणुकीत मनोज जरांगे पाटील यांनी वेट अँड वॉचची भूमिका घेतली. कोणत्याही राजकीय पक्षांना पाठिंबा दिला नाही. मात्र, आता त्यांनी विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. सगे सोयऱ्यांना आरक्षण देण्याची अंमलबजावणी झाली नाही तर मी विधानसभेच्या 288 जागा लढवणार आहे, असं मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केलं आहे. मनोज जरांगे यांच्या या मोठ्या घोषणेमुळे राजकीय पक्षांना घाम फुटणार असल्याचं बोललं जात आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये मीडियाशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे. सगळ्या जातीच्या लोकांना एकत्र घेऊन मी निवडणूक लढणार आहे. राज्यातील 288 जागांवर उमेदवार देणार आहे, असं सांगतानाच लोकसभेच्या निवडणुकीत एक झालं. मराठा एक झाला. मोदींना गोधड्या घेऊन महाराष्ट्रात यावं लागलं. चार पाच नेत्यांमुळे मोदींवर ही वेळ आली, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. वंचित आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर आमच्यासोबत आहेत की नाही हे वेळ आल्यावर सांगेन. आता सांगणार नाही, असंही त्यांनी सांगितलं. तसेच आपली प्रकृती बरी असल्याचंही ते म्हणाले. माझी प्रकृती सध्या चांगली आहे. दौरा मोठा झाल्याने अंग थर थरत होतं. दोन ते तीन दिवस आराम करण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिला. आता तब्येत बरी आहे. कोणीही रुग्णालयात येवू नये. प्रकृती ठीक झाल्यावर मी उपोषण सुरू करणार आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.



### भावनिक होऊ नका

पाचव्या टप्प्यातील निवडणुकीत आम्ही कुणाला पाठिंबा दिला नाही. नाशिकमध्ये मी पाठिंबा दिल्याच्या पोस्ट फिरल्या. मात्र मी कुणालाही पाठिंबा दिला नाही. दुसरा निवडून येईल आपल्यात नाराजी नको. पाचव्या टप्प्यातील ही निवडणूक आहे. भावनिक होऊ नका. हे लोक आता पाया पडतील. मात्र आपल्या मुलांच्या बाजूने राहा. भावनिक होऊन कुणाच्या मागे जाऊ नका. लेकरांना न्याय मिळवण्यासाठी ताकतीने उभे रहा, असं आवाहन त्यांनी केलं.

### म्हणून सभा रद्द

नारायण गडावर होणारी जगातील सर्वात मोठी सभा रद्द का करण्यात आली याची माहितीही त्यांनी दिली. नारायण गडावर काहीही तयारी नव्हती. तिथे पाण्याची टंचाई होती. त्यामुळे सभा स्थगित करण्यात आली आहे. सभेची पुढची तारीख कळवली जाणार आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## बोरगावात दहीहंडी फोडून काल्याच्या कीर्तनाने सप्ताह सांगता

**प्रतिनिधी | बीड**

केज तालुक्यातील बोरगाव बुद्रुक येथे गुरूवारी बारामती येथील कन्हेरी संस्थानचे लक्ष्मण महाराज कोकाटे यांच्या काल्याच्या कीर्तनाने गुरूवार १६ मे रोजी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली. यावेळी आळंदी येथील पाटील काका यांच्या हस्ते दंही हंडी फोडून काल्याचा प्रसाद वाटप करण्यात आला. केज तालुक्यातील बोरगाव बुद्रुक येथे वै.लक्ष्मण काका क्षीरसागर यांच्या पुण्यतिथी सोहळ्या निमित्त गुरूवार ९ मे पासुन गावातील मारोती मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व श्री. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास सुरूवात झाली होती. बुधवार १५ मे रोजी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता झाल्यांनतर गावात सायंकाळी शोभायात्रा काढण्यात आली. या शोभयात्रेत गावातील विद्यार्थीनी डोक्यावर कलश घेवुन सहभागी झाल्या होत्या. तर सप्ताहासाठी आलेले मान्यवर कीर्तनकार, भजनी मंडळी , तरूण यांनी ग्यानबा तुकारामचा जयघोष केला. गावातील महिलांनी प्रमुख मार्गावर रांगोळ्या काढून शोभयात्रेचे स्वागत केले. गुरूवारी सकाळी ९ ते ११ या वेळेत बारामती येथील कन्हेरी संस्थानचे लक्ष्मण महाराज कोकाटे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता करण्यात आली.सप्ताह यशस्वीतेसाठी पांडूरंग महाराज क्षीरसागर, बाळासाहेब गव्हाणे ,ज्ञानोबा वळेकर, सुरेश गव्हाणे, दत्तात्रय महाराज बडगे, केशव महाराज येडशीकर ,केशव महाराज, हनुमंत महाराज,भिमराव महाराज जगदाळे यांनी परिश्रम घेतले. दहीहंडी फोडून वाटला काला



बोरगाव येथील मारोती मंदिराच्या प्रांगणात गुरूवारी दुपारी १२ वाजता काल्याच्या कीर्तनानंतर आळंदी येथील पाटील काका यांच्या हस्ते दही हंडी फोडण्यात आली त्यांनतर कीर्तनासाठी आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. पंगतीत भाविकांनी घेतला प्रसाद सप्ताहाच्या सांगतेनंतर गावातील मारोती मंदिराच्या परिसरात महिला व पुरूष भाविकांनी महाप्रसादासाठी गर्दी केली होती. मंदिराच्या परसिरात भाविकांच्या पंगती लागल्या होत्या.

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला होत असलेल्या मानसिक व आर्थिक शोषण गटविकास अधिकारी वर कारवाई करा -मोरे

**वादळवार्ता/बीड** जाईबाई जानबा मोरे, सेवानिवृत्त पर्यवेक्षिका, महिला व बालकल्याण विभाग बीड येथून दिनांक 31 जानेवारी 2019 रोजी सेवानिवृत्त झालेली असून आज तागायत प्रत्येक स्थान निश्चितीसाठी महिला व बालविकास कार्यालयाकडून पैशाची मागणी करून त्याची आर्थिक व मानसिक शोषण या व्यवस्थेने केले आहे. आजही सातव्या वेतन आयोगाचा चौथा हप्ता त्यांच्या खात्यावर जमा झाला नसून तो जमा करण्यासाठी वारंवार अनंत्रे प्रभाकर दशरथ (सहायक गटविकास अधिकारी) यांच्याकडून पैशाची मागणी होत आहे. आश्वासित प्रगती योजनेचे फरक बिल व त्याचा लाभ आजही मला दिलेला नाही, यासाठीही मला गेल्या दोन महिन्यापासून फोन कॉल्स करून मानसीक त्रास दिला जात जात आहे.मोरेची मूळ सेवा पुस्तिका गहाळ केली जाईल अशा धमक्या वारंवार दिल्या जात आहेत. मूळ वेतनाच्या 25 टक्क्याने रोख रक्कम वरिष्ठांना स्वतः येऊन द्यावे अन्यथा तुमचे निवृत्तीवेतन बंद केले जाईल अशा आशयाची धमकी वारंवार दिली जात आहे. हे सर्व फक्त मी एकल व दलित महिला असल्या कारणामुळे होत आहे असा माझा ठाम विश्वास आहे. यामुळे माझ्या आरोग्य, मानसिक आणि आर्थिक नुकसानीस सर्वस्वी महिला आणि बालकल्याण विभाग आणि अनंत्रे प्रभाकर दशरथ (सहायक गटविकास अधिकारी) जबाबदार असेल याची नोंद घ्यावी. या प्रकरणात न्याय द्यावा व त्यांच्या वर करावी करा या मागणीचे नियोजन देण्यात आले आहे.



## साडेचार वर्षाच्या दूर्वा वाघची राज्यस्तरीय आदर्श क्रीडा रत्न पुरस्कार २०२४ साठी निवड!

**( पाटोदा प्रतिनिधी )**

पाटोदा तालुक्यातील दासखेड हे गाव तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात प्रसिद्ध असलेले गाव म्हणून या गावाची ओळख बाजीबाबा देवस्थानासाठी प्रसिद्ध असलेले दासखेड राज्याच्या नकाशावर दासखेड ची ओळख आहे याच गावातील अमोल वाघ यांची कन्या दुर्वा वाघ हिला राज्यस्तरीय आदर्श क्रीडा रत्न पुरस्काराची मानकरी ठरली आहे. सध्या (ह.मु) ओम शांती ओम सोसायटी आंबेगाव बुद्रुक कात्रज पुणे. मुळगाव दासखेड ता पाटोदा जिल्हा बीड अशा छोट्याशा खेडेगावातील मुलीने अवघ्या साडेचार राज्यस्तरीय आदर्श क्रीडा रत्न पुरस्काराची मानकरी ठरली आहे. साडेचार वर्षाच्या वयामध्ये 8 किलोमीटर स्केटिंग पूर्ण केले. कीप ऑन रोलिंग स्केटिंग अकॅडमी बारामती येथे आयोजित करण्यात आले होते. ट्रॉफी देऊन सत्कार समारंभ करण्यात आला. दुर्वा ही सध्या रॉक ऑन विल स्केटिंग अकॅडमी मध्ये प्रशिक्षण घेत आहे तिचे कोच विजय मलजी सर यांच्या मार्गदर्शनाखाली स्केटिंग क्रीडा प्रकारात विविध ठिकाणी यश प्राप्त करीत कर्तबगारी दाखवत आहे. दुर्वा ही रॉक ऑन व्हील या अकॅडमीत वयाच्या साडेतीन वर्षापासून रोलर स्केटिंग शिकत आहे. जिल्हा पातळीवर यशस्वी होत ती राज्य पातळीसाठी पात्र ठरलेली आहे. आत्तापर्यंत 5 सुवर्ण 6 रौप्य आणि कास्यपदक 4 अशी 15 पदके मिळालेली आहेत. नुकत्याच पुण्यात झालेल्या Extreme रेकॉर्डस, नॅशनल रेकॉर्डस,आणि एशिया पॅसेफिक रेकॉर्ड्स, असे वेगवेगळे रेकॉर्ड मध्ये आपले नाव तिने नोंदवले आहे. आणि पुढे ती गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड ची तयारी करत आहे. अतिशय कमी वयात अत्यंत गोड अशा या चिमुरडीने केलेल्या या कामगिरीबद्दल राज्यस्तरीय आदर्श क्रीडा रत्न पुरस्कार 2024 साठी तिची निवड करण्यात आली आहे. अशा विविध ठिकाणी तिचा सत्कार सन्मान करण्यात येतो भरभरून कौतुक करण्यात येते.दुर्वा ही सरहद प्री प्रायमरी स्कूल स्कूलमध्ये शिक्षण घेत आहे शाळेत देखील एक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी विद्यार्थी ठरत आहे. स्केटिंग क्रीडा प्रकारामध्ये दुर्वा ने देशाचे प्रतिनिधित्व करावे अशा या गोड मुलीला पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

## बातमी का लावली म्हणून पत्रकाराला मारहाण,,,(आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे निवेदन)

**(पुसद प्रतिनिधी)**

बातमी का लावली म्हणून पत्रकार प्रकाश तीराळे यांना मारहाण केल्याप्रकरणी आरोपीला तात्काळ अटक करण्यात यावी या आशयाचे निवेदन युवा ग्रामीण पत्रकार संघ, पुसद यांच्या वतीने दि. 13 मे 2024 रोजी पुसद उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले आहे. सविस्तर वृत्त असे की कोल्हापूर जिल्ह्यातील मुरगूड नगरपरिषदेचा माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख राजेखान जमादार यांनी "बायकांनी भर चौकात मारहाण, केल्याची बातमी आपल्या वृत्तपत्रात का? लावली म्हणून 9 मे 2024 रोजी पत्रकार प्रकाश तीराळे यांना रोडवरून फरफटत नेले आणि मारहाण केली. या प्रकरणी मुरगूड पोलिसांनी पत्रकार प्रकाश तीराळेवर दबाव आणून गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करीत होते, परंतु जिल्ह्यातील पत्रकारांनी पोलीसावर गुन्हे दाखल करण्यासाठी दबाव आणल्याने अखेर गुंड प्रवृत्तीचा जिल्हाप्रमुख त्यांचे साथीदार आसिफखान उर्फ मॉन्टी असदखान जमादार, संदीप अशोक सनगर यांचेवर "पत्रकार संरक्षण कायद्यानुसार, गुन्हे दाखल करण्यात आले. परंतु पोलिस यांना अटक करण्यास टाळाटाळ करीत असून, या गुंड प्रवृत्तीच्या लोकांना तात्काळ अटक करण्यात यावी करिता यवतमाळ जिल्ह्यातील तालुका पुसद येथे सुद्धा पत्रकार संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हा सचिव राजेश सोनुने, तालूका अध्यक्ष



राजू राठोड, तालुका ग्रामीण अध्यक्ष राजेश ढोले, तालुका सचिव कुलदिप सुरोशे, शब्बीर शेख, कैलास श्रावणे, विजय निखाते, ऋषिकेश जोगदंडे, प्रशांत देशमुख मारोतराव

कविता

## सलोखा!

राजकारण गेलं चुलीत
माणूस जगला पाहिजे
प्रत्येक जाती धर्मातला
बंधुभावाने वागला पाहिजे.

मतभेद असू द्या
मनभेद चालणार नाहीत
एकमेकांना पाण्यात बघून
प्रश्न आपले सुटणार नाहीत.

एकाच गावात राहून
माणसात फूट पाडू नका
थोर साधुसंतांचे विचार
माती मध्ये गाडू नका.

प्रक्षोभक अन् विघातक
आजिबात लिहू नका
जातीपाती मध्ये कुणीच
विनाकारण दूही माजवू नका.

राजकारण असतं घडीचं
पिढीचं वैर घेऊ नका
गावागावात एकमेकांना
त्रास कुणी देवू नका.

सामाजिक सलोखा
सर्वांनाच राखावा लागेल
जातीवाद सोडून देवून
बंधुभाव जपावा लागेल!

प्रा.पंजाबराव येडे



# डागाळलेली खाकी...

**बीड प्रतिनिधी** नंदकुमार ठाकूर यांनी पोलीस अधिक्षक म्हणून बीड जिल्ह्यात पदभार घेतल्यापासून खाकीची होत चाललेली सामान्यांमधील मलीन प्रतिमा आज जिल्ह्यातच नव्हे तर थेट राज्यात चर्चचा विषय ठरू लागली आहे. दोन दिवसापूर्वी जिजाऊ मल्टीस्टेट प्रकरणात जी घटना घडली, त्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली. आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे गुन्हयात आरोपी न करण्यासाठी थेट १ कोटींच्या लाचेची मागणी करतो आणि याप्रकरणाचे बिंग फुटते. काल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खाडेच्या घराची झाडाझडती घेतली असता त्याच्या घरातून १ कोटी ८ लाखांची नगदी रोकड, ७२ लाखांचे सोन्याचे दागिने, ४ लाख ६२ हजारांची चांदी, पाच वेगवेगळ्या ठिकाणी मालमत्ता असल्याचे कागदपत्रे समोर आल्यानंतर दिवसभर वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या आणि सोशल मीडियातून पोलीस दलाबाबत येणाऱ्या प्रतिक्रिया 'डागाळलेली खाकी' ची लक्षणे अधोरेखित करणारी ठरल्या आहेत. याचा एसपी म्हणून नंदकुमार ठाकूर आता तरी विचार करणार का? की आपला सेवेतील एक-एक दिवस काढत चालणार हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थितीत होत आहे. खाकी वर्दी चढविली की पोलिसांनी नाती गोती आणि वैयक्तिक मते विसरून निःपक्षपाती काम केले पाहिजे, अशी रास्त अपेक्षा पोलिसांकडून सामान्यांना असते. कारण वर्दी एका नव्या माणसाला जन्म देते. तो सर्वांचा रक्षणकर्ता असतो. त्याच्यासमोर येणाऱ्या



अन्यायग्रस्ताला न्याय मिळवून देणे आणि अन्याय करणाऱ्याला धडा शिकविणे असे काम पोलिसांच्या हातून व्हावे, अशी साधारणपणे या व्यवस्थेची रचना आहे. मात्र, वर्दी चढविली, म्हणजे त्याच्यातील माणूस आणि माणुसकी संपली असे नाही. उलट, ती अधिक संवेदनशील होण्याची गरज आहे. मात्र बीडमध्ये सध्या नेमके याच्या उलटे होत आहे. काही असंवेदनशील व्यक्तींमुळे संपूर्ण वर्दीच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. त्यामुळे पोलिस आणि जनता यांच्यामधील विश्वासाची जागा संशयाने आणि टीकेने घेतली असे म्हणायला हरकत नाही. बरं त्याला खतपाणी घालणाऱ्या घटनाही तशा सातत्याने घडत आहेत. यात हिंसाचाराची घटना असेल अथवा वाढत्या घरफोड्या, किंवा चोरी, खुनाचे प्रकार. अगदी बोलायचेच झाले तर ठाकूर यांच्या कार्यकाळात साधारण १० पोलिसांवर लाच प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे पोलीस दलाची मातृसंस्था समजली जाणारी उद्दात हेतूनेच हे आता कशावरून समजायचे? स्वतःचे गल्लाभरुपणा करणारे अधिकारी असतील तर जनतेने न्याय मागायचा तरी कोणाकडे हा प्रश्न आहे. ठाकूर यांनी पोलीस दलात मर्जीतील अधिकाऱ्यांना कायम जपण्याचा प्रयत्न केला आणि यातूनच असे प्रकार फोफावत गेले. भ्रष्टपणाच्या तक्रारी आल्यानंतर ही डोळ्यावर पट्टी झाकल्यामुळे त्यांनी कायम चूक बरोबर पेक्षा 'वजनदार' अधिकारी जपण्याचा प्रयत्न केला. वरिष्ठ अधिकारीच जर भेदभाव करत असतील तर खाली इतर अधिकारी याचा फायदा का घेणार नाहीत हे कशावरून ? ग्रामीण पोलीस ठाण्यात एक कर्मचाऱ्याला लाच घेताना पकडले तेंव्हा थेट ठाणेप्रमुखावर कारवाई होते. पण स्थानिक गुन्हे शाखेतील कर्मचारी एसीबीच्या ट्रॅपमध्ये अडकला गेला तर या शाखेच्या प्रमुखाला मोकळे रान मिळते हा कोणता न्याय आहे ? दरम्यान जिल्ह्यात गुटखा, पत्त्यांचे क्लब, अवैध दारू धंदे, वाळू माफियांचा नंगानाच नवा नाही. पोलिसांवर हल्ल्याच्या घटना घडल्या. पण पोलीस दलाचा प्रमुख म्हणून एसपींनी यावर उपाययोजना करण्यासाठी काय केले? अगदी कालच्या निवडणुकीत तर पोलिसांनाही बुथवरूनच हसकावून लावण्याचे प्रकार अनेक ठिकाणी घडले आहेत. पण जिल्हयात ठाकूर यांनी पदभार घेतल्यापासून स्वतःच खाकीला मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केल्याने आज पोलिसांची मलिन प्रतिमा होत गेली आहे. आणि आता तरी हा कारभार ते सुधारणार आहेत की नाही असा सवाल यानिमित्ताने उपस्थितीत होत आहे.ॉ

# खोट्या गुन्ह्यांना कंटाळून पेठ बीड पोलिसांच्या विरोधात पत्रकार नविद इनामदार सह कुटुंबीयांचा आत्मदहनाचा इशारा

## कोणत्याही प्रकारे शाहनिशा न करता पेठ बीड पोलिस ठाण्यात सारखीच गुन्ह्यांची मालिका सुरू

**वादळवार्ता/बीड**

पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते नविद इनामदार यांनी खोट्या गुन्ह्यांना कंटाळून सह कुटुंब आत्मदहन करण्याचा इशारा एका निवेदनाद्वारे पोलिस आयुक्त यांच्या सह पोलिस अधीक्षक आणि पोलिस महा निरीक्षक यांना दिला आहे गेल्या अनेक दिवसांपासून शेख नाजीयां ही महिला आमच्या सह आमच्या कुटुंबातील महिला आणि नातेवकांवर ही विविध खोटे गुन्हे दाखल करत आहे आणि तिच्या सांगण्यावरून पेठ बीड पोलिस कोणत्याही प्रकारची चौकशी अथवा तपास न करताच झटपट गुन्हा दाखल करून मोकळे होत आहेत ही मालिका गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे आता मात्र या सर्व प्रकारामुळे आम्हाला आर्थिक ,मानसिक ,आणि कौटुंबिक त्रास होत आहे या सर्व प्रकाराला आम्ही पुरते वैतागलो असून आता सामूहिक आत्मदहन करण्या व्यतिरिक्त आमच्या कडे दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहिला नाही आमच्या वरील गुन्ह्याचा फेर तपास करून ते खोटे गुन्हे रद्द करा नसता आम्ही आत्मदहन करू असा इशारा या निवेदनातून दिलेला आहे. आम्ही सर्व सर्व साधारण लोक आहोत आमच्या मागील वयक्तिक जीवनात आमची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही मात्र काही कौटुंबिक कारणामुळे गेल्या काही दिवसांपूर्वी शेख नाजीया यांच्याशी थोडे फार किरकोळ वाद झाले होते मात्र त्यांनी काही दिवसांपासून खोट्या तक्रारी करण्याचा जणू सपाटाच लावला असल्याचे दिसत आहे अनेक संबंधित पोलिस ठाणे ही कोणत्याही प्रकारे शहानिशा न करता आमच्यावर गुन्हे दाखल करत असल्याने आता आम्ही याला कंटाळलो आहोत दिनांक 10-5-2024 रोजी आम्ही असा कोणताही वाद केला नसताना ही आमच्यावर विविध कलमा अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले सध्या खोट्या गुन्ह्यातील नमूद फिर्यादीत सांगितल्याप्रमाणे शेख वाजेद चांद हे 10-5-2024 रोजी सकाळी 12 ते 1 पर्यंत शहरातील बशीर गंज भागात होते. त्या ठिकाणी विविध सीसीटीव्ही कॅमेरे आहेत यात हे निदर्शनास येईल त्याच प्रकारे शेख नविद शेख चाँद त्या वेळेस पेराडाईज हॉस्पिटल या ठिकाणी एका रुग्णास भेटण्याकरिता गेले असता तरी ही कोणत्याही प्रकारची विचारपूस न करता तपास न करता आमच्यावर विविध कलमानुसार गुन्हा नोंदवण्यात आला, कृपया या सर्व प्रकारचे तपास करून आमच्यावरील खोटे गुन्हे रद्द करण्यात यावे नसता आम्ही सह कुटुंब आत्मदहन करू असे ही निवेदनात म्हटले आहे.

# भाजपा व राष्ट्रवादीने वंचित मतदारांना मतदान करण्या पासून रोखले :-अशोक हिंगे यांचा आरोप




बीड (प्रतिनिधी) :- मतदान झाल्यानंतर दोन दिवस गावनिहाय माहिती घेतल्यानंतर बहुतांशी गावात भाजपा व राष्ट्रवादी ने वंचित गरीब मतदारांना मतदान करण्या पासुन रोखण्यात आल्याचा आरोप वंचित चे लोकसभा उमेदवार अशोक हिंगे यांनी केला आहे.

ते पुढे म्हणाले कि संपूर्ण बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात ज्या गावात भाजपाचे प्राबल्य आहे तिथे भाजपाने व ज्या गावात राष्ट्रवादीचे प्राबल्य आहे तिथे राष्ट्रवादीने गावातील वंचित, दलित, बारा बलुतेदार,आदिवासी , अल्पसंख्याक मतदारांना मतदान करण्यापासुन वंचित ठेवुन दहशत व दादागिरीने धमकावुन फक्त बोटाला शाई लावु द्यायचे व मशिनवर बटन गावातले गावगुंडानी दाबायचे असे गैरप्रकार घडले आहेत . या सर्व गैरप्रकाराची रितसर लेखी तक्रार माझे प्रतिनिधी ज्ञानेश्वर कवठेकर यांनी सकाळीच जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे दिली होती परंतु त्यांनी दिवसभर कुठलेही कारवाई चे पाऊल उचलले नाही.या प्रकारामुळे आमच्या हक्काच्या मतदाराना मतदान करता न आल्याने वंचित च्या मताच्या आकडेवारीला मोठा फटका बसणार आहे.

त्यामुळे चार तारखेला भाजपाचा किंवा राष्ट्रवादीचा उमेदवार निवडुन आला तरी तो विजय ढिसाळ जिल्हा निवडणुक यंत्रणेचा असेल.निवडून आलेला उमेदवार बोगस मतावर दादागिरीने आणी दहशतीने झालेला खासदार असेल अशी संतप्त प्रतिक्रिया अशोक हिंगे पाटील यांनी दिली आहे..

# सकिना बलवंड यांचे निधन झाले



**वादळवार्ता/कुडूत्री**

सकिना मियालाल बलवंड वय (८५) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे,तीन मुली,सुना, नातवंडे असा परिवार आहे. कसबा तारळे ग्रामपंचायतचे विद्यमान सदस्य हकीम मियालाल बलवंड यांच्या त्या मातोश्री होत.

# मतदानाआधी पैसे वाटपावरुन आरोप आणि राडे, महाविकासआघाडीचे ५ कार्यकर्ते ताब्यात

भाजपचे उत्तर पूर्व मुंबईचे उमेदवार मीहिर कोटेचा यांच्या कार्यालयाबाहेर शुक्रवारी रात्री राडा झाला होता. मीहिर कोटेचा यांच्या कार्यालयात पैसे वाटप होत असल्याचा आरोप ठाकरेंच्या शिवसैनिकांनी केला. त्यानंतर तात्काळ स्वत: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यालयात आले. तर पोलिसांनी कोटेचा यांच्या कार्यालयाबाहेर घोषणा देणाऱ्या उद्धव ठाकरेंच्या शिवसैनिकांना ताब्यात घेतलं. त्यावरुन आता उद्धव ठाकरे यांनी थेट पोलिसांनाच इशारा दिलाय.दोन्ही बाजुचे कार्यकर्ते भिडले शुक्रवारी रात्री दादरच्या शिवाजी पार्कात एकीकडे पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत सभा जेमतेम संपली होती. त्याचवेळी मुलुंडमध्ये ठाकरेंच्या शिवसैनिकांनी भाजपचे उमेदवार मीहिर कोटेचा यांच्या कार्यालयात पैशांचा खेळ सुरु असल्याचा आरोप केला. ठाकरेंचे शिवसैनिक कोटेचा यांच्या कार्यालयाबाहेर जमल्यानंतर, भाजपचेही कार्यकर्ते एकवटले आणि त्यांचीही घोषणाबाजी सुरु झाली. मुलुंडमध्ये दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते आमनेसामने आल्यानंतर तणाव निर्माण झाला..त्याचवेळी गृहमंत्री फडणवीस त्याच कार्यालयात आले. फडणवीस फोन वरुन बोलतानाही दिसले. काही वेळानंतर कार्यालयातून निघाले.





# पावसाळ्याच्या अगोदर माजलगाव शहरातील सर्व नालेची साफसफाई व स्वच्छता मोहीम राबविण्यात यावेत ,मुस्ताक कुरेशी



**(माजलगाव प्रतिनिधी)** माजलगाव शहरातील सर्व ठिकाणी रस्ते, नाल्या, ओपन पेस,व नगरपरिषद बेघर लोकांसाठी आरक्षित जागेवर आज संपूर्ण अतिक्रमण झाले असून नगरपरिषद कार्यालय कडुन व संबंधित अधिकारी दुर्लक्ष करित असल्याने माजलगाव शहरातील सर्व ठिकाणी अतिक्रमण झाले असून रस्त्यावरुन चालताना अडचण निर्माण झाली असून तसेच नाल्या मधिल घाण अडकल्या साफसफाई करण्यासाठी अडचण निर्माण होते परंतु त्याठिकाणी अतिक्रमण काढण्यासाठी प्रयत्न केले जात नाही शहरातील सर्व वार्डातील प्रत्येक महिन्याला जर एकाच वार्डातील अतिक्रमण पथकं मार्फत काढण्यासाठी प्रयत्न केले तर नक्कीच माजलगाव शहरात अतिक्रमण मुक्त होईल आज माजलगाव शहरातील जमीनील लाखो रुपये भाव झाले असून कोणी कुठे ही अतिक्रमण करून जमीनीवर ताब्यात घेतले जात असून जर असेच होत असेल तर यांच्या वर कोण कारवाई करणार?? नगरपरिषद कार्यालय मध्ये अतिक्रमण पथकं तयार करुण माजलगाव शहरातील सर्व ठिकाणी रस्ते, नाल्या, ओपन पेस, व बेघर लोकांसाठी आरक्षित नगरपरिषद मालकीची जमीन, सर्व ठिकाणी अतिक्रमण पथकं मार्फत काढण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे

# कांदबरीकार डॉ श्रीकांत पाटील यांना सेतुबंध साहित्य पुरस्कार प्रदान

विठाइ वारकरी शिक्षण संस्था पंढरपूर व सेतुबंध प्रतिष्ठान पुळुज यांच्या वतीने साहित्य पुरस्कार वितरण सोहळा पंढरपूर येथे नुकताच पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माझे शिक्षक आमदार माननीय दत्तात्रय सावंत सर उपस्थित होते. पुरस्कार वितरण सोहळा ह भ प भागवत महाराज चौरे उपाध्यक्ष अखिल भाविक वारकरी मंडळ आंबेकर आजरेकर फड यांच्या शुभहस्ते पार पडला.

सेतुबंध साहित्य पुरस्कार राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक व राज्य शासन पुरस्कार प्राप्त कादंबरीकार डॉ श्रीकांत पाटील, सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ शिवाजी शिंदे, कवी श्री आबा पाटील मंगसुळी, कथाकार श्री हरिश्चंद्र पाटील टेंभुर्णी, राजेश पवार, जैनुद्दीन मुलानी, शिवाजी वाघमारे यांना प्रदान करण्यात आला.

# मातृदिनानिमित्त वृद्धाश्रमातील वृद्ध मातांचे पूजन व मायेची साडी देऊन साजरा



**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे पंकज भंडारी**

वसुंधरा परिवार सोशल फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा योगिताताई गोसावी यांनी मातृदिनाचे औचित्य साधून धायरी येथील सूर्योदय वृद्धाश्रमात वृद्धांसाठी सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम आयोजित केला होता. आई हीच आपली पहिला गुरू आहे तिच्यामुळेच आपले अस्तित्व आहे. दिवस रात्र कष्ट करून ती आपले भविष्य उज्वल करते. आईचे हे ऋण आपण कधीच फेडू शकत नाही म्हणूनच तिच्याप्रति प्रेम कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सर्व जगभर 12 मे रोजी मातृदिन साजरा केला जातो. माझी आई जाऊन 15 वर्षे झाली पण आजही तिचे संस्कार तिची मोलाची शिकवण मला जीवनात उपयोगी पडतात. या मातृदिनानिमित्त निराधार वृद्ध मातांचे पूजन करून त्यांना मायेची साडी देऊन कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी सूर्योदय वृद्धाश्रमच्या संस्थापिका छायाताई भगत यांच्यामुळे मिळाली याबद्दल मनापासून धन्यवाद. बाबुराव सुगंधी, शुभदा कोकीळ व प्रज्ञेश गोसावी या गायकांनी सुमधुर आवाजात अप्रतिम गाणी सादर करून त्यांचे मनोरंजन केले. वृद्ध मातांनी सांगितले की आम्हाला खूप आनंद झाला तुम्ही आमच्यासाठी गाण्यांचा कार्यक्रम आयोजित केला आम्हाला बाहेर जाता येत नाही आमच्यासाठी गाण्यांचा कार्यक्रम नेहमी घेत जा व असेच भेटत रहा खूप छान वाटते. या सर्व वृद्धांची डॉ सुहास दिवाकर यांनी आरोग्य तपासणी करून औषधे देऊन अनमोल सेवा केली. सामाजिक कार्यकर्त्या मिलनताई पवार, शैलेंद्र निर्मळे, अनिल स्वामी, विश्वनाथ लवाटे, डॉ राजेंद्र भवाळकर, अश्विनी कदम इ उपस्थित होते.

# कार,मोटर सायकल व बैलगाडीच्या अपघातात एकाचा मृत्यू तर चार जण गंभीर !

**(माजलगाव प्रतिनिधी)**



तेलगावकडुन माजलगावकडे भरधाव वेगात जाणाऱ्या कारने एका मोटारसायकलसह बैलगाडीस जोराची धडक दिल्याने झालेल्या तिहेरी अपघातात एकाचा मृत्यू तर एका लहान बालकासह चार जण जखमी झाल्याची घटना १८मे शनिवार रोजीच्या रात्री ७ वा.दरम्यान खामगाव-पंढरपुर महामार्गावर माजलगाव तालुक्यातील निजुड येथे घडली. अपघाता प्रकरणी समजलेल्या माहितीनुसार राष्ट्रीय खामगाव-पंढरपुर महामार्गावरील दरम्यान तेलगावकडुन माजलगावकडे जाणाऱ्या कार क्र. एम एच.२५ ए एस ८७६६ ने एका मोटारसायकलला पाठीमागून जोराची धडक दिली.ही धडक बसताच शेतातुन घराकडे जाणाऱ्या बैलगाडीस ही कारने जोराची धडक दिली.या धडकेत मोटारसायकलवरील रतन कांबळे(४५) रा.ह.मु.काळे वस्ती उमरी ता.माजलगाव यांना डोक्यात गंभीर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला . तर मोटारसायकलवरील मनिषा सुरेश वाघमारे(४०),लक्ष्मी लखन कदम (३०)व कार्तिक लखन कदम (३) हे गंभीर जखमी झाले.तर निजुड येथील शेतकरी बाळासाहेब मोहन घुले सायंकाळी ६:४५ वा.च्या सुमारास शेतातुन घराकडे जात असतानाच त्या कारची बैलगाडीस जोराची धडक बसल्याने घुले यांच्यासह दोन्ही बैलांना मार लागून ते गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान अपघात घडल्याचे समजताच निजुड येथील सामाजिक कार्यकर्ते शेख अतिक नामदेव बोरचाटे व इतरांनी घटनास्थळी दाखल होत तात्काळ १०८ रूग्णवाहिकेस कॉल केला असता रूग्णवाहिकेचे चालक शाम चव्हाण यांनी तेलगावहुन केवळ चार मिनीटात घटनास्थळी रूग्णवाहिका दाखल केली. रूग्णवाहिकेचे डॉक्टर एम.बीड. गायकवाड यांनी जखमींना माजलगाव ग्रामिण रुग्णालयात उपचारांचासाठी दाखल केले आणि डॉ.सुभाष बडे यांनी जखमींवर उपचार करून पुढील उपचारार्थ बीडला पाठवले.

# चांदी ९० हजार; तर सोन्याने केला नवीन रेकॉर्ड, सुवर्णनगरीत ग्राहक बेहाल



सुवर्णनगरी जळगावमध्ये सोने आणि चांदीच्या दरवाढीच कहर झाला. खरेदीसाठी आलेले ग्राहक या भाववाढीपुढे हतबल दिसले. त्यातील अनेकांनी खरेदीचा बेत रद्द केला. तर काहींना कमी सोन्यात खरेदीचा आनंद मानावा लागला. जागतिक स्तरावर सोने आणि चांदीच्या किंमती भडकले, त्याचा परिणाम बाजारपेठेत दिसून येत आहे. मौल्यवान धातूच्या किंमती आता जीएसटीसह सामान्यांच्या अवाक्याबाहेर गेल्या आहेत. अनेकांच्या खरेदीच्या उत्साहावर पाणी फेरले तर अनेक जण हिरमसून बाजाराबाहेर पडले.सर्वकालीन उच्चांकी भाव सुवर्णनगरी जळगावच्या सराफ बाजारात सोने चांदीचे आजपर्यंतचे सर्वाधिक विक्रमी भाव पाहायला मिळाला.जळगावच्या बाजारात सोन्याच्या भावात एक हजाराने तर चांदीच्या दरात प्रती किलोमागे 3 हजार रुपयांनी भाव वाढ दिसली. सोन्याने 75 हजारांचा आकडा पार तर चांदी सुद्धा 90 हजारांचा टप्पा ओलांडून विक्रमी दरावर पोहचली. सोन्याचा भाव जीएसटीसह 76 हजार 200 तर चांदीचे भाव प्रति किलो 91 हजारांवर पोहचला. जळगावच्या सराफ बाजाराच्या इतिहासात सोने आणि चांदीचे आजपर्यंचे सर्वात विक्रमी भाव ठरला आहे.दरवाढ कशामुळेजागतिक बँकांचे व्याजदर कमी झाले आहे. सुरक्षित गुंतवणूक म्हणून गुंतवणूकदारांनी सोन्याकडे आपला कल वळवला आहे. तर चीनमध्ये सोने आणि चांदी खरेदीसाठी ग्राहकांची मोठी झुंबड उडाली आहे. अनेक देशाच्या मध्यवर्ती, केंद्रीय बँक सोन्याचा साठा करुन ठेवत आहेत. या सर्व कारणांमुळे सोन्यामध्ये सातत्याने भाव वाढ होत असल्याची माहिती सराफा व्यावसायिकांनी दिली आहे. या दरवाढीने गुंतवणूकदारांचा फायदा झाला आहे. तर खरेदीदारांचा मोठा हिरमोड झाला आहे.

## शासनाकडून मिळणारे वेतन पोलीस अधिकाऱ्यांना पुरत नाहीत का? लाखोंची लाच मागणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकावर एसीबीकडून गुन्हा दाखल

**बीड प्रतिनिधी** लाखोंची लाच मागणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकावर पुणे एसीबी पथकाकडून गुन्हा दाखल करण्यात आला असून नुकतेच बीड येथील पोलीस निरीक्षक व सहाय्यक उपनिरीक्षक यांच्याकडे लाचेच्या माध्यमातून जमा केलेले कोट्यावधींचे घबाड नुकतेच सापडल्याने राज्यातील पोलीस दलात मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली, हे प्रकरण व त्यावरील कारवाई ताजी असतानाच पुण्यातही लाचेचे प्रकरण समोर आले आहे. यामुळे 'शासनाकडून मिळणारे भरमसाठ वेतन पोलीस अधिकाऱ्यांना पुरत नाहीत का?', असा प्रश्न व शंका समाजातून उपस्थित होऊ लागले आहे. पुणे येथे घडलेल्या एका गुन्ह्यामध्ये पुढील कारवाई न करण्यासाठी पाच लाखांची लाच मागून तडजोडी अंती तीन लाख रुपये लाच मागणाऱ्या पोलीस उपनिरीक्षकावर



पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चंदननगर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय सर्जेराव शेगर (PSI Dattatraya Sarjerao Shegar) असे गुन्हा दाखल केलेल्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव आहे. दत्तात्रय शेगर हे पुणे पोलीस आयुक्तालयातील चंदननगर पोलीस ठाण्यात (Chandan Nagar Police Station) कार्यरत आहेत. एसीबीच्या या कारवाईमुळे पुणे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. याबाबत ४० वर्षीय व्यक्तीने पुणे एसीबीकडे (Anti-corruption, Pune) तक्रार केली आहे. तक्रारदार हे महावितरण विभागात नोकरी करतात. त्यांच्याविरुद्ध चंदननगर पोलीस ठाण्यात मिटर चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे पीएसआय शेगर यांनी सांगितले. तसेच या गुन्ह्याचा तपास आपण स्वत: करीत असून पुढील कारवाई न करण्यासाठी शेगर यांनी तक्रारदार यांच्याकडे ५ लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदार यांना एवढी रक्कम देणे शक्य नसल्याने तडजोडी अंती त्यांच्याकडून ३ लाख रुपयांची लाच मागितली. याबाबत तक्रारदार यांनी पुणे एसीबीकडे तक्रार केली. एसीबीच्या पथकाने पडताळणी केली असता पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय शेगर यांनी तक्रारदार यांच्या विरुद्ध चंदननगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मिटर चोरीच्या गुन्ह्यात कारवाई न करण्यासाठी पाच लाख रुपये लाच मागून तीन लाख रुपये स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार एसीबीने पीएसआय दत्तात्रय शेगर यांच्यावर गुन्हा दाखल केलं असून या प्रकरणाचा पुढील तपास एसीबीचे पोलीस निरीक्षक रुपेश जाधव करीत आहेत.

## मोहनराव जगताप यांच्याकडून गंगामसला येथील पिडीत सलून दुकानदारांना आर्थिक मदत



**माजलगाव (प्रतिनिधी)** दी 18: माजलगाव तालुक्यातील गंगामसला येथील बस स्थानक परिसरात असलेल्या नाभिक समाजाच्या चार सलून दुकान अज्ञातांनी रविवारी 12 मे च्या रात्री फोडल्याची घटना घडली. यामध्ये नाभिक समाजाच्या चारही दुकानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले या प्रकरणाची भारतीय जनता पार्टीचे नेते माजलगाव विधानसभा प्रमुख मोहनराव जगताप यांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी भेट देऊन चारही दुकानदारांना धीर दिला व दुकानदारांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांना त्यांची दुकाने पुन्हा उभा करण्यासाठी आर्थिक मदत केली. तसेच इतरांनाही या गरीब दुकानदारांना मदत करण्याचे अवाहन केले. यावेळी गंगामसला येथील ज्येष्ठ नेते श्रीकृष्ण सोळंके, सरपंच भालचंद्र सोळंके, नाभीक समाजाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे, बाबा दळवी, उपसरपंच अविनाश गोंडे,अँड गणेश गवळी यांच्यासह

# माजलगाव ग्रामीण रुग्णालयात गरोदर माता यानां सोय सुविधा उपलब्ध करा,, मुस्ताक कुरेशी

**माजलगाव प्रतिनिधी** माजलगाव ग्रामीण रुग्णालयात गरोदर माता यांना उपचार अडथळा येत असून सोनोग्राफी मशीन असून त्यास चालविण्यासाठी डॉक्टर उपलब्ध नाही रात्री जर एखाद्या पेंशट आले तर अडचण निर्माण होते नसता बीड येथे रेफर करण्याऐवजी माजलगाव ग्रामीण रुग्णालयात सोय सुविधा उपलब्ध करुन गरोदर माता यांना वेळेवर उपचार मिळेल अशा सोय सुविधा उपलब्ध करा सोनोग्राफी मशीनसाठी डॉक्टर उपलब्ध करणे औषध गोळ्या उपलब्ध करणे प्रशासने नेमून दिलेल्या वेळेवर डॉक्टर उपलब्ध करणे गरोदर माता याना सोय सुविधा उपलब्ध करणे रुग्णालयात स्वच्छता नसून घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून संडास बाथरुम मध्ये पाणी सुध्दा नाही त्यांची तात्काळ दखल घेऊन संडास बाथरुम मध्ये पाणी आणि स्वच्छता राबविण्यात यावी. अशा अनेक समस्या निर्माण



झालेल्या असून वेळी च योग्य नियोजन करा माजलगाव ग्रामीण रुग्णालयत गरोदर माता यांची सोय सुविधा उपलब्ध करुण तसेच सोनोग्राफी मशीनसाठी डॉक्टर उपलब्ध करणे तसेच सर्व यंत्रणा एक्सरे मशीन चालू २४ घंटे सुविधा उपलब्ध करुण अडचण दुर करण्यात यावे अशी मागणी मा, जिल्हाधिकारी यांच्या कडे ईमेल द्वारे प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने करण्यात आली असून लवकरत लवकर योग्य नियोजन करा नसता विविध प्रकारचे कार्यालय समोर आंदोलन करु असा

## नेहरू सेंटर वरळी येथे दिनांक १७ मे २०२४ ला लोकनृत्याचा कार्यक्रम संपन्न

नेहरू सेंटर, वरळी येथे दिनांक १७मे २०२४ रोजी लावणी लोकनृत्य सादर करण्यात लोकनृत्य लावणी माझी सखी हया कार्यक्रमा द्वारे त्याचे सूत्रसंचालन आणि नृत्य दिग्दर्शन कविता कोळी यांनी केले, सहाय्यक स्मृती मुरांजन, सृष्टी देशमुख , विशाल काळे तसेच मार्गदर्शन माया जाधव, विजया कदम आणि सचिन गजमल यांनी केले, संगीत संयोजन अशोक वांगणकर यांचे होते पार्श्वगायिका प्रज्ञा अनाम, वादक ज्ञानेश्वर ढोरे , विशेष सहाय्य नेहरू सेंटर* पदाधिकारी व सहकारी यांनी केले कलाकार किरण पाटील, गौरीश माधव सादरकर्ते होते शंभर शिबिरार्थी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी नेहरु सेंटरचे सहसंचालक चंद्रकांत राणे आणि समन्वयक प्रकाश पवार यांचे अनमोल सहकार्य लाभले आहे.



## गीतकार भारत कवितके यांचे बापू बिरु वाटेगा- वकर अमर झाला गाणे युट्यूबवर प्रसारित झाले.

शनिवार दिनांक १८ मे २०२४ रोजी मुंबई कांदिवली येथील पत्रकार साहित्यिक गीतकार भारत कवितके यांचे बापू बिरु वाटेगावकर यांच्या जीवनातील घटना वर आधारीत " बापू बिरु वाटेगावकर अमर झाला हे गाणे युट्यूबवर प्रसारित झाले. धनगर समाज बांधवांना सार्थ अभिमान असलेल्या अशा बापू बिरु वाटेगावकर गोरं गरिबांचे कैवारी, गावगुंडाचे कर्दनकाळ,व त्यांच्या जीवनातील घटना,त्यांचा स्वभाव,गुण,यावर प्रकाश टाकणारे गाणे गीतकार भारत कवितके यांनी " बापू बिरु वाटेगावकर अमर झाला" हे गाणे लिहिले आहे." बापू बिरु वाटेगावकर अमर झाला या गाण्याचे कुशल निर्माता श्रीराम घडे यांनी शब्द,चाल, संगीत,गायन, यांना एकत्र करून निर्माता श्रीराम घडे यांनी या गाण्याला योग्य न्याय दिला आहे., युट्यूबवर वरील अनेक प्रसिद्ध गाण्याचे पहाडी आवाजाचे यशस्वी गायक विकास साळवे यांनी या गाण्याला आपल्या गायन शैलीतून वेगळेपण सिद्ध केले आहे.तर युट्यूबवर अनेक गाजलेल्या गाण्याचे प्रसिद्ध संगीतकार चंदन कांबळे यांनी या गाण्याला संगीत देऊन गाणे श्रवणीय केले आहे. एकंदरीत शब्द रचना, संगीत,गायन,यांची योग्य मांडणी करून गाणे रसिकांना मंत्रमुग्ध करेल यात शंका नाही.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरुपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )